कायम विना अनुदानित तत्त्वावरील नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व सध्या सुरु असलेल्या विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकड्या सुरु करण्यांस LOI देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयटीसी-२२१५/प्र.क्र. ५४/व्यशि-३,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ जून, २०१५

संदर्भ :-

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.आयटीआय-१०९९(८८)/व्यशि-१, दि.१९ मे,२०००.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. आयटीआय-२२१३/प्र.क्र.१४६/व्यशि-३, दि.२२ ऑगस्ट, २०१३.

३) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१२/खाऔप्रसं/नवीन मान्यता/२०१४/९६४, दि.३०/१०/२०१४.

४) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१२/खाऔप्रसं/नवीन मान्यता /२०१४/१०१९ दि.२६/१२/२०१४.

५) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १२/खाऔप्रसं/नवीन मान्यता /२०१५/६७, दि.०५/०२/२०१५.

६) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१२/खाऔप्रसं/२०१५/११५, दि.१६/४/२०१५.

७) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१२/खाऔप्रसं/२०१५/११६, दि.१६/४/२०१५.

प्रस्तावना :

राज्यामध्ये नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांस व सध्या सुरु असलेल्या विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नविन व्यवसाय/जादा तुकड्या सुरु करण्यांसाठी इच्छूक संस्थांनी संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडे अर्ज सादर केले होते. सदर अर्जांची छाननी करण्यासाठी संचालनालय स्तरावर, तांत्रिक छाननी समिती गठित करण्यांत आली होती. सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन त्यामध्ये पात्र ठरलेल्या संस्थांचे प्रस्ताव आपल्या शिफारशीसह संदर्भीय (३) ते (७) येथील पत्राव्दारे शासनास सादर केले होते. अशा प्रकारे शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, त्यावर पुढील निर्णय घेण्याकरिता संदर्भीय(१) येथील शासन निर्णयाव्दारे गठित करण्यांत आलेल्या उच्च स्तरीय समितीची दि. २०/०४/२०१५रोजी

बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार कायम विनाअनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांस व विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकड्या सुरु करण्याच्या प्रस्तावांना LOI देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उच्चस्तरीय समितीच्या दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक १ एप्रिल, २०१४ ते ३१ मार्च, २०१५ या कालावधीत प्राप्त अर्ज विचारात घेऊन सोबत जोडलेल्या सहपत्र "अ" मध्ये नमूद १६ नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना आणि सहपत्र "ब" मध्ये नमूद २८ विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकड्या सुरु करण्यांस कायम विना अनुदान तत्त्वावर खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून इरादापत्र (LOI) देण्यांत येत आहे.

<u>अटी व शर्ती</u> :-

१) LOI देण्यांत आलेल्या सदर नवीन १६ संस्थांना (सहपत्र-अ) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने डी.जी.ई.टी., नवी दिल्लीच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार आवश्यक त्या बाबींची १०० टक्के पूर्तता करुन QCI मार्फत अधिस्विकृती प्राप्त करुन घेऊन सदर व्यवसायांना एन.सी.व्ही.टी.,नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल. तसेच एन.सी.व्ही.टी.,नवी दिल्ली यांचेकडून संलग्नता प्राप्त झाल्यानंतर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून LOA प्राप्त करुन घ्यावे लागेल. सदर LOA प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. अन्यथा संबंधित संस्था "महाराष्ट्र राज्यात कृषि,पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनिधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३" प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

२) LOI देण्यांत आलेल्या सदर २८ विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (सहपत्र-ब) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने डी.जी.ई.टी.,नवी दिल्लीच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार आवश्यक त्या बाबींची १०० टक्के पूर्तता करुन QCI मार्फत अधिस्विकृती प्राप्त करुन घेऊन सदर व्यवसायांना एन.सी.व्ही.टी.,नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी जागेल. तसेच एन.सी.व्ही.टी.,नवी दिल्ली यांचेकडून संलग्तना प्राप्त झाल्यानंतर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून LOA प्राप्त करुन घ्यावे लागेल. सदर LOA प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. अन्यथा संबंधित संस्था "महाराष्ट्र राज्यात कृषि,पशु व मत्स्य विज्ञान,आरोग्य विज्ञान,उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनिधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम,२०१३ " `प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

३) सदर संस्थांना LOA निर्गमित करतांना, त्या संस्थेने नियमानुसार सर्व बाबींची पूर्तता केली आहे किंवा नाही, याची तपासणी करण्याची जबाबदारी संचालनालयाची राहील.

४) शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५ एप्रिल,२००२ नुसार सदर नवीन मान्यता दिलेल्या संस्थेने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी रु.१,००,०००/- (रुपये एक लांख फक्त) एवढी अनामत रक्कम संचालक (प्रशिक्षण) यांच्या पी.एल.ए. खात्यात जमा करणे अनिवार्य राहील.

५) शासन निर्णय क्र.पीटीआय-१०००/२४६/व्यशि-२, दि. १५ एप्रिल,२००२ नुसार सदर विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) प्रति व्यवसाय, प्रति तुकडी एवढी अनामत रक्कम संचालकांच्या पी.एल.ए. खात्यात जमा करणे अनिवार्य राहील.

६) एन.सी.व्ही.टी.,नवी दिल्ली यांची संलग्नता व संचालनालयाचे LOA प्राप्त नसतांना विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. असे अनधिकृत प्रवेश दिल्यास सदर प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणत्याही समुचित प्राधिकरणाच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार नाही व त्यामुळे उद्भवणाऱ्या सदर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

७) नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासंदर्भात तसेच विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नवीन व्यवसाय अभ्यासक्रम/जादा तुकडी सुरु करण्यांसंदर्भात वेळोवेळी निर्ममित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

८) डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे / निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश, संलग्नता, परीक्षा इत्यादी बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संबंधित संस्थेस देण्यांत आलेले LOI चे आदेश तात्काळ रद्द करण्यांत येतील.

९) डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांनी तसेच शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०) नवीन संस्था सुरु करण्यांसाठी तसेच विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम/जादा तुकडी सुरु करण्यासाठी LOI दिलेल्या संस्थांनी विहित अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध करणे अनिवार्य राहील.

११) सदर शासन निर्णयान्वये LOI दिलेल्या नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकड्या विहितरित्या प्रत्यक्षात सुरु करण्यांत आल्या आहेत किंवा नाही याबाबतचा अहवाल संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई-१ यांनी शासनास सादर करावा.

१२) या आदेशान्वये LOI देण्यांत आलेल्या नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील नवी व्यवसाय/जादा तुकड्या या दिनांकापासून तीन वर्ष कालावधीच्या आंत प्रत्यक्षांत सुरु करणे अनिवार्य राहील. ज्या नवीन संस्था/ अभ्यासक्रम/ जादा तुकडी या कालावधीत सुरु होणार नाहीत, त्यांना देण्यांत आलेले LOI चे आदेश रद्द करण्यांसाठी आवश्यक असलेला प्रस्ताव शासनास सादर करण्यांची जबाबदारी संचालनालयाची राहील.

१३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण ३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दिनांक १४.०५.२०१५ अन्वये निर्गमित केलेले आदेश ऑगस्ट, २०१५ या सत्रापासून होणा-या प्रवेशासाठी प्रवेश नियमावली आणि शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांना प्रशिक्षण शुल्क नियमावली लागू करण्यात आली आहे. उपरोक्त प्रमाणे सुरु होणाऱ्या नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी सदर आदेश लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६१५१३१६५५६२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Madhav Patil
Digitally signed by Vivek Madhav Patil
DN: CN = Vivek Madhav Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2015.06.16 16:28:46 +05'30'

(विवेक पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२) सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक /औंरगाबाद व अमरावती. (संचालनालयामार्फत)
३) मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६) सह सचिव (व्यशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत)
११) सर्व संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय. (संचालनालयामार्फत)
१२) संबंधित खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संचालनालयामार्फत)
१३) निवड नस्ती (व्यशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : आयटीसी-२२१५/प्र.क्र. ५४/व्यशि-३, दिनांक : १५ जून, २०१५ चे सहपत्र.

सहपत्र- "अ"

कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यांत आलेल्या नविन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी.

अ.क्र.	खाजगी औ.प्र`.संस्थेचे नांव	संस्थेस परवानगी दिलेल्या व्यवसाय / तुकड्या	
		व्यवसाय	तुकडी
१	२	३	४
विभागाचे नांव :- मुंबई			
१	रामअवतार सुरजमल मोदी खाजगी औ.प्र. संस्था,मु. बोरीगांव,पो. बोर्डी, ता.तलासरी,जिल्हा-ठाणे-४०१७०१.	जोडारी	१ ली व २ री तु.
		विजतंत्री	१ ली व २ री तु.
		आरेखक स्थापत्य	१ ली व २ री तु.
विभागाचे नांव :- नाशिक			
२	खानदेश खाजगी औ.प्र. संस्था, मेन रोड, चाळीसगांव, जिल्हा-जळगांव ४२४ १०१.	जोडारी	१ ली व २ री तु.
		जोडारी २री पाळी	३ री तु. व ४ थी तु.
		विजतंत्री	१ ली व २ री तु.
		विजतंत्री २री पाळी	३ री तु. व ४ थी तु.
३	विद्या निकेतन खाजगी औ.प्र.संस्था, ६७०, विद्यानगरी, पुणे-नाशिक हायवे, एलेफाटा जवळ, मु.पो.बोटा, ता.संगमनेर, जि. अहमदनगर.	संधाता (गॅस व इलेक्ट्रीक)	१ ली व २ री तु.
		तारतंत्री	१ ली व २ री तु.
		आरेखक (स्थापत्य)	१ ली व २ री तु.
		आरेखक (यांत्रिकी)	१ ली व २ री तु.
		विजतंत्री	१ ली व २ री तु.
		जोडारी	१ ली व २ री तु.
४	आप्तेष्ट बहुउद्देशिय खाजगी औ.प्र. संस्था, बोई लेन पिंपळनेर, तालुका-साक्री, जिल्हा-धुळे	सर्व्हेअर	१ ली तु. व २ री तु.
		विजतंत्री	१ ली तु. व २ री तु.
विभागाचे नांव :- पुणे			
५	लोकशाहीर अण्णाभाऊ साठे खाजगी औ.प्र.संस्था, शेगांव रोड, जत, ता.जत, जि. सांगली	विजतंत्री	१ ली व २ री तु.
		जोडारी	१ ली व २ री तु.
		संधाता (गॅस व इलेक्ट्रीक)	१ ली व २ री तु.
६	कोताबाई गंगणे खाजगी औ.प्र. संस्था, गेट नं.७७/५, कटराल, ता.मंगळवेढा,जि-सोलापूर.	जोडारी	१ ली,२ री व ३ री तु.
		विजतंत्री	१ ली,२ री व ३ री तु.
		आरेखक यांत्रिकी	१ ली, २ री व ३ री तु.
विभागाचे नांव :- औरंगाबाद			
७	उज्ज्वल खाजगी औ.प्र.संस्था, मु.डिघोलंबा, जि.बीड	संधाता (गॅस व इलेक्ट्रीक)	१ ली व २ री तु.
		विजतंत्री	१ ली, २ री, ३ री व ४ थी तु.
		जोडारी	१ ली व २ री तु.

अ.क्र.	खाजगी औ.प्र`.संस्थेचे नांव	संस्थेस परवानगी दिलेल्या व्यवसाय / तुकड्या	
		व्यवसाय	तुकडी
१	२	३	४
८	इंडियन फायर सर्व्हिस इंजि. ॲण्ड सेफ्टी ७ मॅनेजमेंट खाजगी औ.प्र.संस्था, गेट नं.४५, प्लॉट नं.२५,२६,२७ कुभेपाल, ता. जि. औरंगाबाद	विजतंत्री	१ ली व २ री तु.
		फायर टेक्नो. ॲण्ड इंड सेफ्टी मॅनेजमेंट	१ ली व २ री तु.
		जोडारी	१ ली व २ री तु.
विभागाचे नांव :- अमरावती			
९	स्व.सौ. मिनाताई जाधव खाजगी औ. प्र.संस्था,शेलगांव, शेगांव रोड, ता. शेगांव, जि. बुलढाणा.	जोडारी	१) १ ली तु. २) २ री तु. ३) ३ री तु. तिसऱ्या पाळीत
		विजतंत्री	१) १ ली तु. २) २ री तु. ३) ३ री तु. तिसऱ्या पाळीत
विभागाचे नांव :- नागपूर			
१०	नव-युवा खाजगी औ.प्र. संस्था, मेन रोड, भंडारा- ४४१ ९०४.	जोडारी	१ ली व २ री तु.
		जोडारी २री पाळी	३ री तु. व ४ थी तु.
		विजतंत्री	१ ली व २ री तु.
		विजतंत्री २री पाळी	३ री तु. व ४ थी तु.
११	श्रीकृष्णा खाजगी औ.प्र. संस्था, चंदेवाणी, ता.कारंजा (घा) अमरावती रोड, जिल्हा-वर्धा- ४४२ २०३.	विजतंत्री	१ ली,२ री,३ री, ४ थी, ५ वी व ६वी तु.
		जोडारी	१ली,२री,३री,४थी, ५वी व ६वी तु.
१२	किनकर खाजगी औ.प्र.संस्था,रेहाकी रोड, ता.सेलू, जिल्हा- वर्धा	विजतंत्री	१ ली व २री तु.
		जोडारी	१ ली व २री तु.
		आरेखक (स्थापत्य)	१ ली व २री तु.
१३	छत्रपती शिवाजी खाजगी औ.प्र. संस्था, देवरी, चिचकर रोड,देवरी. जि.गोंदिया.	जोडारी	१ ली व २री तु.
		विजतंत्री	१ ली व २री तु.
		आरेखक (स्थापत्य)	१ ली व २री तु.
		संधाता (गॅस व इले.)	१ ली व २री तु.
		यांत्रिक इलेक्ट्रॉनिक्स	१ ली व २री तु.
१४	सवोदय खाजगी औ.प्र. संस्था, बल्लारशा बायपास, बाबुपेठ, चंद्रपूर.	जोडारी	१ ली व २री तु.
		विजतंत्री	१ ली व २री तु.
१५	साई ताज खाजगी औ.प्र.संस्था, द्रुगधामणा वाडी, जि. नागपूर.	जोडारी	१ ली,२ री, ३री व ४ थी तु.
		विजतंत्री	१ ली,२ री, ३री व ४ थी तु.

अ.क्र.	खाजगी औ.प्र`.संस्थेचे नांव	संस्थेस परवानगी दिलेल्या व्यवसाय / तुकड्या	
		व्यवसाय	तुकडी
१	२	३	४
१६	गुरुकुल खाजगी औ.प्र.संस्था, धापेवाडा, धापेवाडा कळमेश्वर, नागपूर	विजतंत्री	१ली तु. व २री तु.
		जोडारी	१ली तु. व २री तु.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : आयटीसी-२२१५/प्र.क्र. ५४/व्यशि-३, दि. १५ जून, २०१५ चे सहपत्र.

सहपत्र- "ब"

कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यांत आलेल्या विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वाढीव व्यवसाय/तुकड्यांना मंजूरी देण्यांत आलेल्या संस्थांची यादी.

अ.क्र.	खाजगी औ.प्र`.संस्थेचे नांव	संस्थेस परवानगी दिलेल्या व्यवसाय / तुकड्या	
		व्यवसाय	तुकडी
१	२	३	४
विभागाचे नांव :- मुंबई			
१	श्री. जेमी एम. झव्हेरी ॲण्ड रुपचंद भाटीया खाजगी औ.प्र.संस्था, श्री. ज्ञानेश्वर हायस्कूल, नेताजी नगर, बंदर पखाडी रोड, ऑपो. लिंग रोड, कांदिवली (पश्चिम),मुंबई-६७	विजतंत्री	१) १ ली तु. २) २री तु. ३) ३री तु. तिसऱ्या पाळीत
		जोडारी	१) १ ली तु. २) २री तु. ३) ३री तु. तिसऱ्या पाळीत
विभागाचे नांव :- नाशिक			
२	आबासाहेब शिवाजीराव सिताराम पाटील खाजगी औ.प्र.संस्था, चिंचपुरा, ता.धरणगांव, जि.जळगांव	विजतंत्री	३री व ४ थी तु.
		जोडारी	३री व ४ थी तु.
		आरेखक (स्थापत्य)	१ली व २री तु.
३	जय हनुमान खाजगी औ.प्र.संस्था, भुसावळ, सर्व्हे नं.७६/१, प्लॉट नं.४,५ एन.एच.६, भुसावळ, जिल्हा-जळगांव.	संधाता	१ली व २री तु.
४	इंदिराबाई ललवाणी खाजगी औ.प्र.संस्था, जामनेर, ता. जामनेर, जिल्हा-जळगांव	संधाता	२री तु.
५	वामनराव इथापे खाजगी औ.प्र.संस्था, वेल्हाळे, मु.राजापूर, ता.संगमनेर, जि. अहमदनगर.	संधाता	३ री व ४ थी तु.
		तारतंत्री	१ ली व २ री तु.
		आरेखक (स्थापत्य)	१ ली व २ री तु.
		विजतंत्री	३ री व ४ थी तु.
		जोडारी	३री व ४ थी तु.
		कातारी	१ली व २ री तु.
६	अहिंसा खाजगी औ.प्र.संस्था, मंडळ शिवार, धुळेरोड, दोंडाईचा, जि. धुळे	आरेखक(स्थापत्य)	१ली व २ री तु.
		संधाता	१) १ ली तु. २) २री तु. ३) ३ री तु. तिसऱ्या पाळीत
		मेकॅनिक कन्झुमर इलेक्ट्रॉनिक्स अप्लायंसेस	१ ली व २री तु.

अ.क्र.	खाजगी औ.प्र`.संस्थेचे नांव	संस्थेस परवानगी दिलेल्या व्यवसाय / तुकड्या	
		व्यवसाय	तुकडी
१	२	३	४
७	श्री संत गाडगे बाबा खाजगी औ.प्र.संस्था, शिवाजीनगर, भुसावळ, जिल्हा-जळगांव.	जोडारी	७ वी तु. ८ वी तु
		विजतंत्री	५ वी तु. व ६ वी तु.
विभागाचे नांव :- पुणे			
८	खाजगी औ.प्र.संस्था, कळंब, ता. इंदापूर, जिल्हा-पुणे- ४१३ ११४.	जोडारी	१ली व २री तु.
		विजतंत्री	१ली व २री तु.
विभागाचे नांव :- अमरावती			
९	ए.एन.एस. इन्फोव्हॅली खाजगी औ.प्र. संस्था, खामगांव, चांदमारी चौक शेलोडी रोड, जिल्हा बुलढाणा. ४४४ ३०३.	विजतंत्री	१) ५वी तु तिसऱ्या पाळीत २) ६वी तु. तिसऱ्या पाळीत
विभागाचे नांव :- नागपूर			
१०	सावित्रीबाई फुले खाजगी औ.प्र.केंद्र, वार्ड क्र.१४, रेशिमबाग चौक, विद्यानगरी, नागपूर-४४० ००९.	विजतंत्री	३री व ४ थी तु.
११	विद्याविहार खाजगी औ.प्र. संस्था, ऑरेंज प्लाझा, २ मजला, मेन रोड, काटोल, जि. नागपूर.	विजतंत्री	३री व ४ थी तु.
		तारतंत्री	१ली व २री तु.
१२	जीवन विकास खाजगी औ.प्र.संस्था, थुगावदेव, ता. नरखेड, जिल्हा-नागपूर. ४४१ ३०१	जोडारी	३री व ४ थी तु.
		विजतंत्री	३री व ४ थी तु.
१३	सरस्वती खाजगी औ.प्र.संस्था, मु.पो. अजनी,ता.कामठ, जिल्हा-नागपूर.	जोडारी	३री, ४ थी, ५वी व ६ वी तु.
		विजतंत्री	३री, ४ थी, ५वी व ६ वी तु.
१४	शरवानी खाजगी औ.प्र. संस्था, प्लॉट नं. २६,२७ गोधनी रेल्वे, नागपूर.	विजतंत्री	३री,४थी, ५वी व ६ वी तु.
		जोडारी	३री तु.
१५	तुलसी खाजगी औ.प्र. संस्था, पेट्रोल पंप (ठाणा) जवाहरनगर, नॅशनल हायवे नं.६, जि.-भंडारा- ४४१ ९०६.	विजतंत्री	३री,४थी, व ५वी तु. तिसऱ्या पाळीत
		जोडारी	३री,४थी, व ५वी तु. तिसऱ्या पाळीत
१६	ताराशक्ती खाजगी औ.प्र.संस्था, सव्हे नं.१७८/१अे-१, नागपूर रोड, ताडली, जि.चंद्रपूर.	विजतंत्री	३री व ४ थी तु.
१७	कर्मवीर कन्नमवार खाजगी औ.प्र.संस्था, नेताजी चौक, बाबुपेठ, शीट नं.२१, ब्लॉक नं.१२४, प्लॉट नं.१०/२, चंद्रपूर.	जोडारी	१ली व २री तु.

अ.क्र.	खाजगी औ.प्र`.संस्थेचे नांव	संस्थेस परवानगी दिलेल्या व्यवसाय / तुकड्या	
		व्यवसाय	तुकडी
१	२	३	४
१८	लक्ष्मणराव मानकर खाजगी औ.प्र.संस्था, रिसामा मु.पो. आमगांव, ता.आमगांव, जि.गोंदीया	विजतंत्री	२ री तु.
		जोडारी	२ री तु.
१९	बल्लारपूर खाजगी औ.प्र. संस्था, बामणी, मु.पो. बामणी, बीआयटी कॅम्प, ता.बल्लारपूर, जि. चंद्रपूर	विजतंत्री	३री व ४ थी तु.
		जोडारी	३री व ४ थी तु.
२०	बल्लारपूर खाजगी औ.प्र. संस्था, येनबोडी,कोठारी रोड, येनबोडी, ता.बल्लारपूर, जि. चंद्रपूर	विजतंत्री	३री व ४ थी तु.
२१	डॉ. ए.पी. पिल्लई खाजगी औ.प्र. संस्था, एस.पी.लॉ कॉलेजच्या बाजूला, तुकूम, जि. चंद्रपूर.	विजतंत्री	३री,४ थी तु., ५वी व ६ वी तु.
		संधाता	१ली तु. व २री तु.
२२	परशुराम खाजगी औ.प्र. संस्था, पटेल पेट्रोल पंप जवळ, कोराडी रोड, पो.-कोराडी, बोखारा, जि-नागपूर.	विजतंत्री	५वी व ६ वी तु
		विजतंत्री	७वी व ८ वी तु
२३	राष्ट्रीय खाजगी औ.प्र. संस्था, बामणवाडा लक्ष्मी गोडाऊन जवळ, ता.राजुरा, जिल्हा-चंद्रपूर- ४४२ ९०५	विजतंत्री	५ वी तु. तिसऱ्या पाळीत
२४	शिंदे खाजगी औ.प्र.संस्था, मुल, तालुका- मुल, जिल्हा- चंद्रपूर.	विजतंत्री	१) ५वी तु तिसऱ्या पाळीत २) ६वी तु. तिसऱ्या पाळीत
२५	इंदिरा खाजगी औ.प्र.संस्था, मु. देवाडा, तालुका जिल्हा- चंद्रपूर.	विजतंत्री	१) ५ वी तु तिसऱ्या पाळीत २) ६ वी तु. तिसऱ्या पाळीत
२६	श्रीराम खाजगी औ.प्र.संस्था, मौदा, मु.पो. मौदा, जि. नागपूर.	विजतंत्री	२ री तु.
		जोडारी	२ री तु.
२७	प्रकाशभाऊ उमाठे खाजगी औ.प्र.संस्था, ग्रामसेवक कॉलनी, एस.टी.स्टँडच्या मागे, जिल्हा-भंडारा	विजतंत्री	३ री तु. तिसऱ्या पाळीत
		जोडारी	३ री तु. तिसऱ्या पाळीत
२८	समृध्दी खाजगी औ.प्र.संस्था, देवळी, तह. देवळी, जिल्हा- वर्धा.	विजतंत्री	३ री, ४ थी, ५ वी व ६ वी तु.
		जोडारी	१ ली, २ री व ३ री तु.